जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 OCT 2025
सकाळ

# अन्नशास्त्र व तंत्रज्ञान अधिविभागातर्फे विविध उपक्रम

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या अन्नशास्त्र व तंत्रज्ञान अधिविभागातर्फे जागतिक अन्न दिनानिमित्त बुधवारपासून (ता. १५) दोन दिवस विविध जनजागृतीपर उपक्रम होत आहेत. बुधवारी शाश्वत अन्नप्रणालीवर प्रदर्शन होणार असून, त्यात शेती ते शाश्वत भविष्य संकल्पनेवर आधारीत शाश्वत अन्नप्रणाली विषयावर एम. एस्सी. चे विद्यार्थी पोस्टर प्रदर्शन करणार आहेत. तसेच अन्नप्रणालीतील प्रत्येक घटकाच्या जबाबदारीविषयी माहिती देतील. गुरुवारी (ता. १६) अन्न व्यावसायिकांसाठी अन्न व औषध प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने मार्गदर्शन व जागरुकता कार्यक्रम होईल. शेतकरी, सर्व खाद्यपदार्थ व्यावसायिक, हॉटेल मालक संघ व सभासद, प्रक्रिया उद्योगांचे प्रतिनिधी, शासकीय संस्था व अधिकारी, विद्यार्थी, शिक्षण संस्था व कर्मचारी यांनी महत्त्वपूर्ण उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन प्रमुख डॉ. प्रवीणकुमार पाटील यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 OCT 2025
पुण्यनगरी

# अन्न दिनानिमित्त उद्यापासून प्रदर्शन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या अन्नशास्त्र आणि तंत्रज्ञान अधिविभागामार्फत जागतिक अन्न दिनानिमित्त बुधवारपासून (दि. १५) दोन दिवस विविध जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन केले आहे. यामध्ये दि. १५ रोजी शाश्वत अन्न प्रणालीवर पोस्टर प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. यामध्ये  शेती ते शाश्वत भविष्य या संकल्पनेवर आधारित 'शाश्वत अन्न प्रणाली' विषयावर एम.एस्सी. विद्यार्थ्यांमार्फत पोस्टर प्रदर्शन करून अन्न प्रणालीतील प्रत्येक घटकाच्या जबाबदारीविषयी माहिती देण्यात येईल. दि. १६ रोजी अन्न व्यावसायिकांसाठी अन्न आणि औषध प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने मार्गदर्शन व जागरूकता कार्यक्रम आयोजित केला आहे. सर्वांनी या उपक्रमांमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन अधिविभागाचे प्रमुख डॉ. प्रवीणकुमार पाटील यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 OCT 2025
पुढारी

# जागतिक अन्न दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात उद्यापासून प्रदर्शन, फेअर ट्रेड कार्यक्रम

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या अन्नशास्त्र आणि तंत्रज्ञान अधिविभागामार्फत जागतिक अन्न दिनानिमित्त बुधवारपासून (दि. १५) दोन दिवस विविध जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवारी शाश्वत अन्न प्रणालीवर पोस्टर प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. यामध्ये 'शेती ते शाश्वत भविष्य' या संकल्पनेवर आधारित 'शाश्वत अन्न प्रणाली' विषयावर एम.एस्सी. विद्यार्थ्यांमार्फत पोस्टर प्रदर्शन करून अन्न प्रणालीतील प्रत्येक घटकाच्या जबाबदारीविषयी माहिती देण्यात येईल. गुरुवारी (दि.१६) अन्न व्यावसायिकांसाठी, अन्न आणि औषध प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने मार्गदर्शन व जागरूकता कार्यक्रम आयोजित केला आहे. उपक्रमांमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन अन्नशास्त्र व तंत्रज्ञान अधिविभागाचे प्रमुख डॉ. प्रवीणकुमार पाटील यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 OCT 2025
लोकमत



सतराव्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेत गटस्तर विजेतेपद प्राप्त करणाऱ्या शिवाजी विद्यापीठाच्या संघासोबत मान्यवर उपस्थित होते.

# राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाला गटस्तर विजेतेपद

## आठ विद्यार्थ्यांना 'बेस्ट प्रेझेंटर' पुरस्कार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** भारत सरकारच्या संसदीय कार्य मंत्रालयातर्फे आयोजित १७ व्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेच्या राष्ट्रीय स्तरावर शिवाजी विद्यापीठाच्या संघाने उत्कृष्ट कामगिरी करत गटस्तर विजेतेपद पटकावले.

विद्यापीठाच्या आठ विद्यार्थ्यांनी सर्वोत्कृष्ट सादरीकरणासाठीचे 'बेस्ट प्रेझेंटर' पुरस्कार पटकावले. यामध्ये स्वप्निल माने, संदेश लडकट, नेहा शिंदे, तेजस सन्मुख, श्रेया म्हापसेकर, चंदनकुमार ओझा, श्रुती कुरणे, प्रतिभा बामणे यांचा समावेश आहे.

युवा संसदेमध्ये शपथ ग्रहण करणे, प्रश्नोत्तराचा तास, विशेषाधिकार भंग प्रस्ताव, राज्यसभेकडून संदेश संसदेमध्ये सादरीकरण, लक्ष्यवेधी प्रस्ताव, बिल पास करणे, नवीन कायदे, विधेयक प्रस्तावांचा विचार करणे, सभागृह विसर्जित करणे, आदी मुद्द्यांवर प्रत्यक्ष संसदेप्रमाणे कामकाज चालवले गेले.

प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी आणि कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. स्पर्धा यशस्वी होण्यासाठी युवा संसद स्पर्धा उपक्रमाचे समन्वयक डॉ. प्रल्हाद माने, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले आणि स्पर्धा संयोजन समितीने परिश्रम घेतले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 OCT 2025
सकाळ



**कोल्हापूर :** संसदीय कार्य मंत्रालयातर्फे आयोजित सतराव्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेत यश मिळविणाऱ्या विद्यापीठाच्या संघासमवेत प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. प्रल्हाद माने, डॉ. तानाजी चौगुले.

# राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेत शिवाजी विद्यापीठास गटस्तर विजेतपद

कोल्हापूर, ता. १३ : भारत सरकारच्या संसदीय कार्य मंत्रालयातर्फे आयोजित सतराव्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाने गट स्तर विजेतपद पटकाविले. आठ विद्यार्थ्यांनी सर्वोत्कृष्ट सादरीकरणाचे 'बेस्ट प्रेझेंटर' पुरस्कार पटकावून उत्कृष्ट कामगिरी केली. यात स्वप्नील माने, संदेश लडकट, नेहा शिंदे, तेजस सन्मुख, श्रेया म्हापसेकर, चंदनकुमार ओझा, श्रुती कुरणे, प्रतिभा बामणे यांचा समावेश आहे.

युवा संसदेत शपथ ग्रहण करणे, श्रद्धांजली अर्पण, नूतन मंत्र्यांचा परिचय, प्रश्नोत्तराचा तास, विशेषाधिकार भंग प्रस्ताव, आवश्यक अहवाल किंवा दस्तऐवजाची सभेसमोर मांडणी, राज्यसभेकडून संदेश संसेदत सादरीकरण, विदेशी प्रतिनिधींचे संसेदत औपचारिक स्वागत, लक्षवेधी प्रस्ताव, बिल पास करणे, नवीन कायदे, विधेयक प्रस्तावांचा विचार करणे, सभागृह विसर्जित करणे या मुद्द्यांवर संसदेप्रमाणे कामकाज झाले. कोलकत्ता येथील राज्यसभेचे माजी खासदार ब्रतीन सेनगुप्ता, केंद्रीय संसदीय कार्य मंत्रालयाच्या युवा संसद उपक्रमाचे संचालक ए. बी. आचार्य, प्रा. डॉ. वैशाली पवार परीक्षक म्हणून उपस्थित होते.

प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळाले. उपक्रमाचे समनवयक डॉ. प्रल्हाद माने, डॉ. तानाजी चौगुले यांनी स्पर्धा यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 OCT 2025
तरुण भारत



कोल्हापूर : कार्यक्रमात मानसशास्त्र अधिविभागाचे विद्यार्थी व शिक्षक.

# 'सोशल मीडियाचं अतिव्यसन घातक'

कोल्हापूर : सोशल मिडीयाचा समाजावर विपरीत परिणाम होत असुन याच्या अतिवापराचे व्यसन घातक आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. यांनी केले.शिवाजी विद्यापीठ मानसशास्त्र अधिविभाग आणि व्यवसाय मार्गदर्शन व मानसशास्त्रीय समुपदेशन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने "जागतिक मानसिक आरोग्य दिन कार्यक्रमात ते बोलत होते. प्रारंभी मानसशास्त्र अधिविभागात पोस्टर प्रदर्शनाने करण्यात आली पोस्टर प्रदर्शनाचे उदघाटन आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी व समुपदेशन केंद्राच्या समन्वयक डॉ. विनिता रानडे यांनी केले. मानसिक आरोग्य सप्ताह, जनजागृती रॅली आणि पथनाट्य आयोजित करण्यात आले.मानसिक जनजागृती रॅलीचे उदघाटन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन शिंदे व वित्त व लेखा अधिकारी डॉ. सुहासिनी पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी समुपदेशक सत्यजीत देसाई, मानसशास्त्र विभागाच्या प्र. विभागप्रमुख प्रा. डॉ. प्रतिमा पवार, अधिविभागाने प्राध्यापक डॉ. अश्विनी पाटील, कुमाक्षी गावडे, विशाल पाटील आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 OCT 2025
सकाळ

# वाचन ही सवय नसून संस्कृती : प्रा. बोरगावकर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातर्फे व्याख्यान

**सकाळ वृत्तसेवा**



कोल्हापूर, ता. १३ : वाचन ही सवय नसून संस्कृती आहे, असे प्रतिपादन नांदेड येथील लेखक, कादंबरीकार, कवी प्रा. मनोज बोरगावकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातर्फे वाचन प्रेरणा दिनानिमित्त 'वाचन संस्कृती' व 'नदीष्ट'ची निर्मिती प्रक्रिया विषयावर आयोजित ऑनलाईन व्याख्यानात ते बोलत होते. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे अध्यक्षस्थानी होते.

बोरगावकर म्हणाले, 'उत्तम पुस्तक वाचनासह माणूस व निसर्ग वाचता आला पाहिजे. पुस्तक वाचून माणूस समृद्ध होतो. वाचनातून संवेदनशीलता निर्माण होते व समाज बदलण्याची शक्ती जन्माला येते. इमान व निष्ठा शाबूत ठेवायला वाचन कारणीभूत ठरते.' 'नदीष्ट' कादंबरीतील विविध प्रसंगांचे संदर्भ देत तिची सर्जनशील निर्मिती प्रक्रिया, निसर्गाशी असलेले नाते, त्यावरील वाचकांच्या प्रतिक्रियांचा अनुभव त्यांनी सांगितला. नदीष्ट केवळ कादंबरी नसून, ती मानवी निसर्ग, वेदना, नाती व समाज यांचा सखोल शोध असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

उपकुलसचिव विनय शिंदे, मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. रणधीर शिंदे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे सहायक कुलसचिव डॉ. शिवाजी शिंदे, डॉ. एकनाथ अंबोकर, डॉ. रमेश साळुंखे, युवराज कदम उपस्थित होते. डॉ. कृष्णा पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. प्रवीण लोंढे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. चांगदेव बंडगर यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 OCT 2025
तरुण भारत

# विद्यार्थ्यांनी आयुष्यात संयम ठेवावा

- डॉ. पी. एस. पांडव
- बीसीए कॉलेजमध्ये सत्कार

प्रतिनिधी
चंदगड

विद्यार्थ्यांनी आई–वडिलांच्या त्यागाची आठवण ठेवून संयमाने वाटचाल करावी, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या संलग्नता विभागाचे उपकुलसचिव डॉ. पी. एस. पांडव यांनी केले.



**चंदगड : डॉ. पी. एस. पांडव यांचा सत्कार करताना प्राचार्य एस. पी. चौगुले.**

चंदगड येथील साऊथ कोकण एज्युकेशन सोसायटीच्या बीसीए कॉलेजमध्ये प्रथम वर्षाच्या नवीन विद्यार्थ्यांच्या स्वागत सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य संतोष चौगुले होते. वेबसाईटचे अनावरण डॉ. पांडव यांच्या हस्ते करण्यात आले. प्रा. पुंडलिक गावडे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. रामजी कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. मयुरी सुतार यांनी आभार मानले. प्रा. कावेरी लोहार, सोनाली गावडे, महेश हाळवणकर, रामचंद्र होसूरकर उपस्थित होते.

14 OCT 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ऋषिकेश, आदित्य, शर्वरी, सृष्टी आघाडीवर

## शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय निवड चाचणी बुद्धिबळ स्पर्धा : ३६ जणांचा सहभाग

सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. १३ : शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय निवड चाचणी बुद्धिबळ स्पर्धेत तिसऱ्या फेरीअखेर पुरुषांमध्ये अग्रमानांकित कोल्हापूरचा ऋषिकेश कबनूरकर, आदित्य सावळकर, तर महिलांमध्ये शर्वरी कबनूरकर, सृष्टी कुलकर्णी संयुक्तपणे आघाडीवर आहेत.**

सायबर येथील नॉन कन्वेन्शनल व्होकेशनल कोर्सेस फॉर वुमेन्स कॉलेजमध्ये या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत. स्पर्धेत कोल्हापूरसह सांगली, सातारा या तीन विभागांतून निवड झालेले एकूण ३६ बुद्धिबळपटूंनी सहभाग घेतला आहे. त्यापैकी १५ बुद्धिबळपटू आंतरराष्ट्रीय गुणांकनप्राप्त आहेत. स्पर्धा पाच फेऱ्यांमध्ये स्विस लीग पद्धतीने व आंतरराष्ट्रीय नियमानुसार होणार आहेत.

पहिल्या दिवशी तिसऱ्या फेरीअखेर पुरुषांमध्ये कोल्हापूरचा अग्रमानांकित ऋषिकेश कबनूरकर व दुसरा मानांकित कोल्हापूरचाच आदित्य सावळकर हे दोघेही प्रत्येकी तीन गुण मिळवून संयुक्तपणे आघाडीवर आहेत, तर महिलांमध्ये कोल्हापूरच्याच शर्वरी कबनूरकर व सृष्टी कुलकर्णी यांनी प्रत्येकी तीन गुणांची कमाई करीत संयुक्तपणे आघाडी घेतली. आणखी दोन फेऱ्या शिल्लक असल्याने उद्या (मंगळवार) च्या निकालाकडे सर्व बुद्धिबळपटूंचे लक्ष लागून राहिले आहे.



**कोल्हापूर** : सायबर कॉलेमध्ये सोमवारपासून सुरू झालेल्या शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय बुद्धिबळ स्पर्धेचे उद्घाटन सिद्धार्थ शिंदे व प्राचार्य डॉ. आर. जी. कुलकर्णी यांनी पटावर चाल करून केले. यावेळी उपस्थित मान्यवर.

क्रीडा क्षेत्रात उतुंग कामगिरी केल्यामुळे शिवाजी विद्यापीठास राज्यातील लीड विद्यापीठ म्हणून मान्यता मिळाली आहे.

स्पर्धेचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे व्यवस्थापन समिती सदस्य सिद्धार्थ शिंदे, सायबर वुमेन्स कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. जी. कुलकर्णी यांनी पटावर चाल करून केले. यावेळी निवड समितीचे सदस्य किरण पाटील, स्मिता कुंभार, राहुल लहाने, सुरेश धुरे, शारीरिक शिक्षण संचालिका रामेश्वरी गुंजीकर, प्रा. विजय रोकडे, गौतम घुणके, डॉ. विद्या पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

### दृष्टिक्षेपात

- **अग्रमानांकितांची प्रभावी सुरुवात** : ऋषिकेश कबनूरकर आणि आदित्य सावळकर यांनी तिसऱ्या फेरीनंतर प्रत्येकी तीन गुण मिळवत वर्चस्व टिकवले; त्यांच्या अचूक चालांमुळे प्रतिस्पर्ध्यांवर दबाव निर्माण झाला.
- **महिला गटात संतुलित स्पर्धा** : शर्वरी कबनूरकर आणि सृष्टी कुलकर्णी यांनी सातत्यपूर्ण खेळ करत संयुक्त आघाडी घेतली असून, त्यांच्या रणनीतीपूर्ण खेळीमुळे पुढील फेऱ्यांमध्ये रंगत वाढली आहे.
- **उर्वरित फेऱ्यांकडे उत्सुकता** : अजून दोन फेऱ्या बाकी असल्याने स्पर्धेचा निकाल अनिश्चित राहिला आहे. मंगळवारच्या निर्णायक फेऱ्यांमध्ये आघाडी टिकवण्यासाठी बुद्धिबळपटूंची लागणार कसोटी.